महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई – ४०० ७०३.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.


क्र. मुंविमं/के.नि./नविन केंद्र प्रस्ताव/9292
वाशी, नवी मुंबई–४०० ७०३.
दिनांक : २१.०९.२०२१

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/ कनिष्ठ महाविद्याल,
जिल्हा ठाणे, रायगड, पालघर, मुंबई दक्षिण/पश्चिम/उत्तर
...........................................................
...........................................................

**विषय** : फेब्रुवारी/मार्च २०२२ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक /माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेकरिता नवीन परीक्षा केंद्र सुरु करणे करिता प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढीबाबत...

**संदर्भ** : १. राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं/परीक्षा–८/३८६५ दि. २३.०७.२०१९
२. या कायालयाचे पत्र क्र. मुंविमं/शाखा के.नि./२०७/५९० दि. १३.०७.२०२१
३. राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं/परीक्षा–८/५७२० दि. २१.०९.२०२१

वरील विषयास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रु./मार्च २०२२ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त (इ.१०वी)व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी ज्या शाळेस/ क.महाविद्यालयात नवीन परीक्षा केंद्र सुरू करावयाचे असल्यास प्रस्ताव फॉर्मची मंडळाकडे पत्राद्वारे मागणी करण्यात यावी व फॉर्म फी रू.१०००/– मंडळाकडे भरून विकत घेण्यात यावा. सदर प्रस्ताव फॉर्म परिपूर्ण भरून मंडळाकडे **दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१** पर्यंत सादर करणेबाबत **संदर्भीय पत्र क्र. २ नुसार** कळविण्यात आलेले होते.

**कोवीड–१९ या विषाणुचा प्रादुर्भावामुळे सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात** शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये पुर्णपणे सुरू झालेली नसल्यामुळे राज्य मंडळाचे **संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार** कळविण्यात येते की, फेब्रुवारी/मार्च २०२२ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी)परीक्षेकरिता नवीन परीक्षा केंद्र सुरु करणे संदर्भात प्रस्ताव सादर करणेकरीता **दि. ३१ ऑक्टोबर, २०२१ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.**

नवीन परीक्षा केंद्र सुरु करणे संदर्भात सादर करावयाच्या प्रस्तावाबाबतच्या सूचना **संदर्भिय पत्र क्र. २** प्रमाणेच राहतील.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई–४०० ७०३.

**प्रत माहीतीस्तव** :–

१. मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.
२. शिक्षण उपसंचालक,मुंबई विभाग,मुंबई.
३. शिक्षणाधिकारी (माध्य.)ठाणे/रायगड/पालघर, शिक्षण निरिक्षक दक्षिण/उत्तर/मुंबई.


Telephone :- 27652445 , 27662504 , 27881075 , 27881077, 27899987 Fax:- 27659491 / 27881349
Email - sschsc.mumbaiboard@gmail.com Manyata207@gmail.com Website - www.sscboardmumbai.in



D:\RAUT SIR\FEB-MARCH 2021\NEW CENTRE APPLICATION.doc